मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकीय उपचाराकरिता आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी रुग्णालय संल्लग्णीकरण (Empaneled) करण्याकरीता “रुग्णालय तपासणी समिती” व “रुग्णालय संल्लग्णीकरण समिती गठीत” करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

मुख्यमंत्री सचिवालय

परिपत्रक क्रमांक :- मुमंसनि-२०२५/प्र.क्र.०५/निधी कक्ष

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- २२.०१.२०२५

परिपत्रक :-

“मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष”, मुख्यमंत्री कार्यालयामार्फत अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये या संदर्भात मदत मिळण्यासाठी असंख्य अर्ज प्राप्त होतात. सदर आर्थिक मदतीचा लाभ मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी संलग्न असलेल्या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना देण्यात येतो. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास सद्यस्थितीत सुमारे ३८०० रुग्णालये संलग्नीत आहेत.

२. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये संल्लग्नीकरण होण्याकरीता अर्ज करणाऱ्या रुग्णालयांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. रुग्णांना वेळेत उपचारासाठी सहाय्य मिळणे व योग्य उपचार व्हावेत यासाठी यापूर्वीच संल्लग्नीकरण करतेवेळी घालून दिलेल्या अटी व शर्तींचे पालन रुग्णालयांनी करणे आवश्यक आहे. त्यानुसार योग्य पध्दतीने अटी व शर्तींचे पालन होते किंवा कसे याबाबत तपासणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. यास्तव सद्यस्थितीत संल्लग्नीत असलेली रुग्णालये अटी व शर्ती यांचे पालन करत आहेत किंवा कसे याबाबतची तसेच नव्याने संल्लग्नीकरणासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करणे याकरीता खालीलप्रमाणे **“रुग्णालय तपासणी समिती”** व **“रुग्णालय संल्लग्नीकरण समिती”** गठीत करण्यात येत आहे.

३.१ रुग्णालय तपासणी समितीची रचना :

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय / महानगर पालिका वैद्यकीय महाविद्यालय / शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय | अध्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| २. | सहयोगी प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय / महानगर पालिका वैद्यकीय महाविद्यालय / शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालये | सदस्य |
| ३. | सहायक प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय / महानगर पालिका वैद्यकीय महाविद्यालय / शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय | सदस्य |
| ४. | मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष प्रतिनिधी | सदस्य सचिव |

३.१.१) प्रत्येक ६ महिन्याला सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये / महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये / शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालये यामध्ये कार्यरत प्राध्यापक, सहायोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक यांची प्रत्येकी १० नावे अशा एकूण ३० सदस्यांची नावे "रुग्णालय तपासणी समिती" करीता संबंधित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास कळवावीत.

३.१.२) अधिष्ठाता यांनी पाठविलेल्या सदस्यांच्या यादीधून यादृच्छिक (Random) पध्दतीने निवड करुन प्रस्तावांच्या संख्येनुसार दरमहा नव्याने समिती / समित्यांची स्थापना मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत करण्यात येईल. तसेच एक व्यक्ती ६ महिन्यांच्या कालावधीत ३ पेक्षा अधिक रुग्णालयांची तपासणी करणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

३.२) समितीची कार्ये :-

३.२.१) संल्लग्नीकरणाकरीता प्रस्ताव प्राप्त झालेल्या रुग्णालयांची प्रत्यक्ष रुग्णालयात जावून तपासणी करणे. तसेच रुग्णालय संल्लग्नीकरणाकरीता निर्धारीत केलेल्या निकषांची पूर्तता संबंधित रुग्णालयाकडून होत आहे किंवा कसे किंवा कसे हे तपासणे.

३.२.२) तपासणी केलेल्या रुग्णालयाचा अहवाल "रुग्णालय संल्लग्नीकरण समितीस" सादर करणे.

४) मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षासाठी रुग्णालय संल्लग्नीकरणाकरीता "रुग्णालय तपासणी समिती" ने सादर केलेल्या अहवालानुसार संबंधित रुग्णालयाची छाननी करुन संल्लग्नीकरण करण्याकरीता खालील प्रमाणे "रुग्णालय संल्लग्नीकरण समिती" स्थापन करण्यात येत आहे.

४.१) रुग्णालय संल्लग्नीकरण समिती

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष | अध्यक्ष |
| २. | मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षातील तज्ञ डॉक्टर | सदस्य |
| ३. | मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षातील तज्ञ डॉक्टर | सदस्य |
| ४. | सहायक संचालक / लेखाधिकारी (लेखा) | सदस्य |
| ५. | कक्ष अधिकारी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष | सदस्य सचिव |

**४.२) रुग्णालय संल्लग्नीकरण समितीची कार्यकक्षा खालीप्रमाणे राहील.**

४.२.१) मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत मिळणाऱ्या वैद्यकीय मदतीसाठी संल्लग्नीत होण्याकरीता रुग्णालय तपासणी समिती" ने सादर केलेल्या प्रस्तावांची छाननी करणे.

४.२.२) संल्लग्नीत असलेल्या रुग्णालयाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करणे.

४.२.३) संल्लग्नीत असलेल्या रुग्णालयाकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या अटी व शर्तींचे पालन होत आहे किंवा कसे याबाबत तपासणी करणे व दोषी आढळल्यास रुग्णालयाची संल्लग्नीतता रद्द करणेबाबत शिफारस करणे.

४.२.४) सदर शिफारशीबाबत अंतिम निर्णयाचा अधिकार वरिष्ठांचा असेल.

४.२.५) रुग्णालय तपासणी समिती बाबत तक्रारी आल्यास तक्रारींची चौकशी करणे.

५. सदर परिपत्रक मुख्यमंत्री सचिवालयाच्या cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

SHARAD RAMLING GHAVATE
Digitally signed by SHARAD RAMLING GHAVATE
Date: 2025.01.22 18:41:52 +05'30'

**(शरद रा. घावटे)**
**कक्ष अधिकारी**
**मुख्यमंत्री सचिवालय**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
२. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मुख्यमंत्री सचिवालयातील सर्व अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
८. सर्व नोंदणीकृत रुग्णालये.
९. निवड नस्ती.